# मंत्रिमंडळ निर्णय

## दिनांक : २२ जानेवारी २०१९

## ( बैठक क्र. २०८ )

| अ.क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | **दिव्यांगांना स्वावलंबी करण्यासाठी राज्य सरकारची नवी योजना** | सामाजिक न्याय |
| २ | **स्व. बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारकासाठी एमएमआरडीएमार्फत १०० कोटींचा निधी** | नगर विकास |
| ३ | **महिला सुरक्षितता पुढाकार योजना मुंबईत राबविणार** | गृह |
| ४ | **पुणे येथील फर्ग्युसन महाविद्यालयाचे विद्यापीठात रुपांतर करण्यास मान्यता** | उच्च व तंत्रशिक्षण |
| ५ | पोलीस शिपाई ते एपीएसआय संवर्गास लाभ<br>**महात्मा फुले जनआरोग्य योजनेत निवृत्त पोलीस कर्मचाऱ्यांचा समावेश** | गृह |

## दिव्यांगांना स्वावलंबी करण्यासाठी
## राज्य सरकारची नवी योजना

दिव्यांग व्यक्तींना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्यासाठी हरित उर्जेवर चालणाऱ्या पर्यावरणस्नेही फिरत्या वाहनावरील दुकान (मोबाईल शॉप ऑन व्हेईकल) मोफत उपलब्ध करण्यास आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. यासाठी लाभार्थ्यांना कमाल पावणेचार लाख रुपये अनुदान मिळणार आहे.

दिव्यांगांना फिरत्या वाहनावरील दुकान मोफत उपलब्ध करण्याची घोषणा अर्थसंकल्पात करण्यात आली होती. त्यासाठी २५ कोटी इतक्या निधीची तरतूद उपलब्ध आहे. दिव्यांग व्यक्तींना पुरेशा सोयी-सुविधा उपलब्ध करून रोजगार निर्मितीस चालना देण्यासह त्यांचे आर्थिक आणि सामाजिक पुनर्वसन करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. अशा योजनांमधून दिव्यांग व्यक्तीला सर्वसामान्य व्यक्तीप्रमाणे त्याच्या कुटुंबासमवेत जीवन जगण्यास सक्षम करणे शक्य होणार आहे. यासाठी लाभार्थ्यांना फिरत्या वाहनाच्या माध्यमातून खाद्यपदार्थ किंवा किरकोळ किराणा विक्री यासारखे व्यवसाय करता येणार आहेत.

महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळामार्फत ही योजना राबविण्यात येईल. लाभार्थ्यांच्या निवडीसाठी महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली जाईल. लाभार्थ्याला स्वत: किंवा अपंग वित्त विकास महामंडळ किंवा बँकेमार्फत कर्जाच्या स्वरूपात भागभांडवल उभारता येईल. अत्याधुनिक संगणकीय प्रणालीद्वारे (Through Online System) लाभार्थ्याच्या व्यवसायास मदत करण्यासाठी GPRS, Software Monitoring, Live Tracking यासारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल.

योजनेच्या अंमलबजावणीसाठी निवडण्यात येणाऱ्या संस्थेकडून वाहनाची देखभाल व दुरुस्ती, निवड केलेल्या व्यवसायानुरूप दिव्यांग व्यक्तींना व्यवसायाचे प्राथमिक प्रशिक्षण, वाहनाची प्रादेशिक-उपप्रादेशिक परिवहन विभागाकडून नोंदणी, दिव्यांग लाभार्थ्यास परवाना देण्यास नाकारल्यास त्याच्यावतीने वाहन चालवणाऱ्या सर्वसामान्य व्यक्तीला वाहन चालवण्याचा परवाना मिळवून देणे, वाहन विमा उतरविणे, संबंधित महानगरपालिका स्थानिक स्वराज्य संस्थांकडून फिरता व्यवसाय करण्याचा परवाना मिळवून देणे आणि समन्वय व सनियंत्रण आदी बाबी केल्या जातील. मोबाइल व्हॅन वाटपासाठी परिवहन विभागाच्या परवानगीने देण्यात येणारे वाहन E-cart व Specification नुसार देण्यात येईल. मोबाईल व्हॅन पुरवल्यानंतर एक वर्ष कालावधीसाठी निवड केलेल्या पुरवठादारकामार्फत देखभाल व दुरुस्ती मोफत करण्यात येईल.

-----o-----

नगर विकास विभाग

## स्व. बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारकासाठी एमएमआरडीएमार्फत १०० कोटींचा निधी

स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृती जपण्यासाठी मुंबईच्या दादरमधील शिवाजी पार्क येथील महापौर निवासस्थानाच्या जागेवर स्मारक उभारण्यात येणार आहे. या स्मारकाचे बांधकाम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत (एमएमआरडीए) करण्यात येणार असून त्यासाठी १०० कोटींचा खर्च करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

शिवसेनाप्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृती जपण्यासाठी शिवाजी पार्क येथील महापौर निवासस्थानावर भव्य स्मारक उभारण्यात येणार आहे. स्मारक उभारणीसाठी ‘बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारकक या संस्थेची नोंदणी यापूर्वीच करण्यात आली आहे. स्मारकाच्या उभारणीसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारक या संस्थेला महापौर बंगल्याची जागा भाडेपट्ट्याने देण्यात आली आहे.

या स्मारकाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे. सल्लागाराने अंदाजित केल्यानुसार प्रकल्पासाठी १०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार, एमएमआरडीएकडून या स्मारकाचे बांधकाम करण्यात येणार आहे. तसेच, त्यासाठी सुरुवातीस १०० कोटींचा खर्चदेखील एमएमआरडीएच्या निधीमधून करण्यात येईल. राज्य शासनाकडून स्मारकासाठी उपलब्ध करण्यात येणाऱ्या तरतूदीमधून या खर्चाची नंतर प्रतिपूर्ती करण्यासही मंजुरी देण्यात आली आहे.

----०----

गृह विभाग

## महिला सुरक्षितता पुढाकार योजना मुंबईत राबविणार

महिलांवरील अत्याचाराच्या गुन्ह्यांना प्रतिबंध करण्यासह त्यांच्या सुरक्षिततेसाठी कायमस्वरुपी उपाययोजना करण्यासाठी केंद्र शासनाच्या सुरक्षित शहर प्रकल्पांतर्गत मुंबईत महिला सुरक्षितता पुढाकार योजना राबविण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

सार्वजनिक ठिकाणी महिलांवर होणाऱ्या अत्याचारांना आळा घालण्यासाठी केंद्र शासनाने सुरक्षित शहर प्रकल्पांतर्गत सुरू केलेली महिला सुरक्षितता पुढाकार योजना देशातील मुंबई, दिल्ली, हैदराबाद, कोलकाता, लखनऊ, चेन्नई, बंगलुरू, अहमदाबाद या शहरात राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. या योजनेत केंद्र आणि राज्य शासनाचा हिस्सा अनुक्रमे ६० आणि ४० टक्के असा आहे. मुंबईसाठी केंद्र शासन १५१ कोटी २० लाख तर राज्य शासन १०० कोटी ८० लाख रूपये देणार असून या योजनेसाठी एकूण २५२ कोटी रूपये मंजूर करण्यात आले आहेत.

या प्रकल्पांतर्गत अस्तित्वातील सीसीटीव्ही यंत्रणेची क्षमता आणि व्याप्ती वाढवून आणखी ५०० हून अधिक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरा बसविण्यात येणार आहेत. त्यासोबतच एसओएस हॉटस्पॉट तयार करणे, ट्रॅक मी सोल्यूशन ॲप तयार करणे, समाजमाध्यमांवरील गैरवर्तन करणाऱ्यांवर देखरेख ठेवून त्यांचा शोध घेणे, मोबाईल डाटा टर्मिनल्स निर्माण करणे, अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देऊन त्यांची क्षमता वाढविणे, प्रसिद्धी व जनजागृती करणे आदी कार्यक्रमांचा समावेश आहे.

-----०-----

## पुणे येथील फर्ग्युसन महाविद्यालयाचे विद्यापीठात रुपांतर करण्यास मान्यता

पुणे येथील फर्ग्युसन महाविद्यालयाचे रुपांतर विद्यापीठात करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. यासंदर्भातील अध्यादेश काढण्यासही मंजुरी देण्यात आली. नव्या फर्ग्युसन विद्यापीठाचे अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून सुरु होतील.

शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासह जागतिकीकरणाच्या वेगाबरोबर रोजगाराभिमुख नवनवीन अभ्यासक्रम, संशोधन व विकास आणि नवोपक्रम राबविण्यासाठी महाविद्यालयांना शैक्षणिक स्वायत्तता देण्याचे शासनाचे धोरण आहे. या संकल्पनेचा पुढील टप्पा म्हणून स्वायत्तता दिलेल्या महाविद्यालयांना भौतिक संरचना व पायाभूत सुविधांसाठी आर्थिक सहाय्य देण्यात येते.

राज्यातील अग्रगण्य शैक्षणिक संस्था असणाऱ्या फर्ग्युसन महाविद्यालयाची स्थापना १८८४ मध्ये पुणे येथील डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून करण्यात आली. गुणवत्तापूर्ण व उत्कृष्ट अशा उच्च शिक्षणाची परंपरा असणारे हे महाविद्यालय भारतातील महाविद्यालयांच्या एनआयआरएफ मानांकनात १९ व्या स्थानावर असून महाराष्ट्रात पहिल्या क्रमांकावर आहे. सध्या स्वायत्त दर्जा असणाऱ्या या महाविद्यालयाचे राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानामधील (रुसा) मार्गदर्शक तत्त्वानुसार विद्यापीठात रुपांतर करण्यात येत आहे. रुसातील सूचनांनुसार स्वायत्त महाविद्यालयांची दर्जावाढ करुन त्यांचे विद्यापीठात रुपांतर करण्याच्या योजनेंतर्गत राज्यात प्रथमच खाजगी अनुदानित संस्थेच्या माध्यमातून नवीन विद्यापीठ स्थापन करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. यानुसार विद्यापीठासाठी आवश्यक पदनिर्मिती आणि भरती करण्याच्या प्रक्रियेस मान्यता देण्यात आली असून त्याचा खर्च डेक्कन एज्युकेशन सोसायटीने करण्यास आणि महाविद्यालयाची मालमत्ता विद्यापीठास हस्तांतर करण्यास मंजुरी देण्यात आली.

-----०-----

गृह विभाग

<u>पोलीस शिपाई ते एपीएसआय संवर्गास लाभ</u>

## महात्मा फुले जनआरोग्य योजनेत निवृत्त पोलीस कर्मचाऱ्यांचा समावेश

राज्यातील निवृत्त सहायक पोलीस उपनिरीक्षक, हवालदार, पोलीस नाईक आणि पोलीस शिपाई यांचा महात्मा फुले जन आरोग्य योजनेत समावेश करण्यास आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार निवृत्त पोलीस उपनिरीक्षक दर्जापेक्षा कनिष्ठस्तरीय संवर्गातील कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ दिला जाणार आहे. राज्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासह विविध आपत्तीप्रसंगी सेवा बजावताना पोलिसांना प्रचंड ताणतणावाखाली काम करावे लागते. तसेच अनियमित दिनक्रमामुळेही त्यांना आरोग्याच्या विविध समस्यांना तोंड द्यावे लागते. या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे.

यापूर्वी महात्मा फुले जनआरोग्य योजनेचा लाभ अंत्योदय, पिवळी, अन्नपुर्णा, केशरी शिधापत्रिका असलेल्या लाभार्थी कुटुंबांव्यतिरिक्त अवर्षणग्रस्त १४ जिल्ह्यांतील शुभ्र शिधापत्रिकाधारक शेतकरी कुटुंब, तसेच शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थी, शासकीय महिला आश्रमांतील महिला, शासकीय वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाकडील निकषानुसार पत्रकारांचा व त्यांच्या कुटुंबांचा आणि महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात

नोंदणी असलेल्या बांधकाम कामगारांचा समावेश आहे. आजच्या निर्णयानुसार या योजनेत आता निवृत्त पोलीस उपनिरीक्षक दर्जापेक्षा कनिष्ठ संवर्गातील कर्मचाऱ्यांचा समावेश होणार आहे.

राज्यातील जनतेला आरोग्याच्या अत्याधुनिक सुविधा मिळाव्यात यासाठी शासनाने महात्मा फुले जन आरोग्य योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत ९७१ शस्त्रक्रिया-उपचार आणि १२१ पाठपुरावा सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. आरोग्य योजनांचा जास्तीत जास्त नागरिकांना लाभ मिळावा यासाठी राज्यात केंद्राची प्रधानमंत्री जनआरोग्य योजना आणि राज्य शासनाची महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजना या दोन्ही योजना समन्वय साधून राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

-----०-----